**तात्काळ**

## दरपत्रक सादर करणे बाबत.

23 JAN 2024

क्रमांक- पोआअ/प्रबंधक शाखा/ई-समन्स प्रणाली/830/२०२४ अमरावती शहर दिनांक :-

**विषय :-** पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवर ई-समन्स प्रणाली १ वर्षाकरीता राबविण्याबाबत दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे बाबत.

---ooo---

उपरोक्त विषयान्वये या कार्यालयाचे आस्थापनेंवर ई-समन्स प्रणाली १ वर्षाकरीता राबविणे अंत्यत आवश्यक आहे.

तरी ईच्छूक पुरवठादार/वितरक/दुकानदानदार यांनी आपली दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीनुसार या कार्यालयास तीन दिवसाचे आत न चुकता सादर करावीत. पहिला लिफाफा विवरणपत्र -१ हा तांत्रिक लिफाफा म्हणून तसेच दुसरा लिफाफा हा विवरणपत्र-२ हा दरपत्रकाचा लिफाफा असे दोन लिफाफा कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. तांत्रिक लिफाफामध्ये खालील आवश्यक कागदपत्रे असणे आवश्यक आहेत.

१ शॉप अॅक्ट प्रमाणपत्राची छायांकीत प्रत (आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र)
२. GST प्रमाणपत्र
३. पॅन कार्डची छायांकीत प्रत

तांत्रिक लिफाफा (विवरणपत्र-१) मध्ये वर नमुद केलेले आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबधीतांना दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे सूचीत करण्यात येईल.सदरचे पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. तरी ईच्छूक निविदाधारकांनी दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

(पोलीस आयुक्त यांचे मान्यतेने)

23/1/2024

प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त,अमरावती करीता.

प्रति,

पोनि, सायबर सेल,

२/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करून अपलोड केल्याबाबतची प्रत कृपया प्रबंधक शाखेत परत करावी.